जाक्र-पोनि/वाळुज वा.शा. /प्रेसनोट/२०२४ -342 छत्रपती संभाजीनगर , दिनांक /०७/२०२४.

**प्रेस नोट**

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहर हद्दीत मौजे पंढरपुर गावात प्रसिध्द विठ्ठल-रुख्मिणी मंदिर आहे. दिनांक १७/०७/२०२४ रोजी आषाढी एकादशी असुन, एकादशीच्या निमीत्ताने शहरातुन, आजु-बाजुच्या गावातील व परिसरातील भाविक मोठ्या प्रमाणात दर्शन व यात्रेसाठी येतात. सदर विठ्ठल-रुख्मिणी मंदीर हे छत्रपती संभाजीनगर-अहमदनगर राज्य महामार्गाला लागुन आहे. नमुद महामार्गावरुन आजु-बाजुचे गावे व परिसरातुन मौजे पंढरपुर गावाकडे सुमारे १५०-२०० लहान मोठ्या दिंड्या मार्गक्रमण करतात. तसेच तेथे राज्य महामार्ग रोडच्या दोन्ही बाजुला यात्रेच्या निमित्ताने छोटे विक्रेते आपली दुकाने लावतात. करीता सदर परिसरात नागरिक व वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ निर्माण होऊन नागरीकांच्या सुरक्षितेस, जिवितास धोका, अडथळा किंवा गैरसोय होऊ नये, म्हणुन मौजे पंढरपुर, वाळुज परिसरातील रस्त्यावरील वाहतूकीचे विनियमन व नियमन करणे आवश्यक आहे.

**दिनांक १६/०७/२०२४ रोजी २०.०० वाजेपासुन ते दिनांक १७/०७/२०२४ रोजी २४.०० वाजेपर्यत छत्रपती संभाजीनगर- अहमदनगर राज्य महामार्गावर खालील प्रमाणे वाहतूक नियोजन करण्यात येत आहे.**

**१) ए. एस. क्लब चौक ते कामगार चौक पर्यंत रस्ता हा सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्यात येत आहे.**

**२) ओॲसिस चौक ते आंबेडकर चौक(FDC Corner)रस्ता हा सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्यात येत आहे.**

**३) तसेच सदर महामार्गावरील नगरनाका ते ए. एस. क्लब चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या जड वाहनांसाठी बंद करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग -**

१) जालना/बीड कडून अहमदनगर-पुणेकडे जाणारी अवजड वाहने ही महानुभव आश्रम चौक, लिंक रोड टी- राष्ट्रीय महामार्ग NH-५२ (नविन सोलापुर- धुळे हायवे) मार्गे साजापुर फाटा, एन.आर.बी.चौक, एफ.डी.सी.कॉर्नर, कामगार चौक मार्गे जातील.

२) जालना/बीड कडून अहमदनगर-पुणेकडे जाणारी हलकी वाहने ( Light good vehicle ) ही नगरनाका, मिटमीटा, तीसगाव चौफुली, वडगाव कोल्हाटी, सारा सार्थक, शनी मंदिर, कार्तीक हॉटेल, रांजणगाव फाटा, एफ.डी.सी.कॉर्नर, कामगार चौक मार्गे जातील.

३) जालना/बीड/जळगाव कडुन धुळे /नाशिकडे जाणारी वाहने लिंक रोड किंवा वाल्मी नाका, राष्ट्रीय महामार्ग NH-५२ (नविन सोलापुर- धुळे हायवे) या मार्गाने जातील व येतील.

४) छत्रपती संभाजीनगर कडुन पुणेकडे जाणारी हलकी वाहने ( Light good vehicle ) ही नगरनाका, मिटमिटा, तिसगांव चौफुली,वडगाव कोल्हाटी, महाराणा प्रताप चौक, एफ.डी.सी.कॉर्नर, कामगार चौक मार्गे जातील.किंवा साजापुर गावातुन एनआरबी चौक रांजणगाव- एफडीसी कॉर्नर- कामगार चौक मार्गे पुढे जातील.

५) पुणे-अहमदनगर कडुन जालना-बीडकडे जाणारी अवजड वाहने ही ईसारवाडी, बिडकीन मार्गे पुढे जातील व येतील.

६) पुणे-अहमदनगरकडुन छत्रपती संभाजीनगर शहरात येणारी हलकी वाहने ( Light good vehicle ) ही पाटोदा टी, संताजी चौकी, वाल्मीनाका, महानुभव चौक मार्गे पुढे जातील.

७) पुणे-अहमदनगर कडुन धुळे-नाशिककडे जाणारी हलकी वाहने ( Light good vehicle ) ही पाटोदा टी, संताजी चौकी, वाल्मीनाका मार्गे राष्ट्रीय महामार्ग NH-५२ (नविन सोलापुर- धुळे हायवे) मार्गे पुढे जातील.

बंदोबस्त प्रभारी अधिकारी हे आवश्यकतेनुसार वाहतूक वळवतील किंवा मार्गात बदल करतील.

सदर अधिसुचना ही पोलीस, रुग्णवाहीका, अग्निशमन दल व अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागु राहणार नाही.

या अधिसुचनेचा भंग करणारी व्यक्ती मो.वा.कायदा, म.पो.कायदा कलम १३१ व अन्य फौजदारी कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहील.

Ingole

**( सचिन इंगोले )**
पोलीस निरीक्षक,वाळुज वाहतूक शाखा.
छत्रपती संभाजीनगर

**प्रति,**

पोलीस निरिक्षक,सायबर सेल, छत्रपती संभाजीनगर.

**प्रत माहितीस्तव सादर-**

मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, छत्रपती संभाजीनगर.